ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - X  Issue - I  November - April - 2021-22

Marathi Part - II

**Peer Reviewed Refereed**
**and UGC Listed Journal**
**Journal No. 47023**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2019 - 6.571**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

Late. Ramesh ... College

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | १९ व्या शतकात ब्रिटीशकालीन भारतात संघटनात्मक राष्ट्रवादाचा उदय<br>**डॉ. पुरूषोत्तम माहोरे** | ७२-७६ |
| १६ | स्वामी विवेकानंद यांचा आध्यात्मिक राष्ट्रवाद<br>**डॉ. पुरूषोत्तम पारीट**<br>**डॉ. पराग पाटील** | ७७-७९ |
| १७ | भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीमध्ये साहित्य व वृत्तपत्राचे योगदान<br>**डॉ. राजेश सुधाकर डोंगरे** | ८०-८५ |
| १८ | संत एकनाथांच्या भारूडाचा सामाजिक अभ्यास<br>**वर्षा रविंद्र उपाध्ये** | ८६-८८ |
| १९ | भारतातील प्रथम स्त्री शिक्षिका-सावित्रीबाई जोतीराव फुले<br>**प्रा. डॉ. कु. मुबारक कुरैशी**<br>**प्रा. योगेश मारोती करवाडे** | ८९-९२ |
| २० | जागतिक दहशतवाद: समस्या, प्रतिबंध व उपाय<br>**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे** | ९३-९७ |
| २१ | भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची ऐतिहासिक मिंमासा<br>**डॉ. प्रदिप शा. ढोले** | ९८-१०२ |
| २२ | भारतातील आधुनिक राष्ट्रवादाच्या उदयाची पार्श्वभूमी<br>**डॉ. भानुदास धोंडीबा शिंदे** | १०३-१०७ |
| २३ | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील जहालवादी राष्ट्रवाद<br>**प्रा. परदेशी सुनील लक्ष्मण** | १०८-११२ |
| २४ | भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीच्या निर्मितीमध्ये साहित्य व वृत्तपत्राचे योगदान<br>**प्रा. डॉ. ठकसेन दादारावजी राजगुरे** | ११३-११५ |
| २५ | सावरकरांचे हिंदुत्ववादी विचार<br>**डॉ. संजय गोपाळराव ठवळे** | ११६-१२० |
| २६ | दहशतवाद : कारणे व उपाय<br>**प्रा. डॉ. नागनाथ नि. तेलंगे** | १२१-१२४ |
| २७ | दहशतवाद हा देशाच्या सर्वांगिण विकासातील प्रमुख अडथळा - एक अध्ययन<br>**विनोद एम. बडवाईक** | १२५-१२९ |




Late Ramesh Warpudkar College Sonpeth (S)

VOLUME - X, ISSUE - I - NOVEMBER - APRIL – 2021-22
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.571 (www.sjifactor.com)

# २०. जागतिक दहशतवादः समस्या, प्रतिबंध व उपाय

**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, कै रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जिल्हा- परभणी.

**प्रस्तावना**

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आजपर्यंत राज्य हे केंद्रस्थानी होते. राज्यांची एक प्रकारची सत्ता होती. राज्य हे सत्तेचे केंद्र होते. आता मात्र राज्यांची सत्ता विभागली गेली आहे. राज्यांच्या सत्तेला आव्हान देणारे नॉनस्टेट अॅक्टर्स- ज्यांना राज्यके म्हटले जाते ते मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. दहशतवाद हा राज्यांचा अदृश्य शत्रु आहे. पूर्वीच्या काळी युद्ध होताना दोन परस्परविरोधी राष्ट्रे समोरासमोर येत असत. त्यामुळे हल्ला कोणावर करायचा हे कळत होते. इथे तशी परिस्थिती नाही. इथे शत्रू हा देशातीलच आहे असे नाही. त्याचे स्थान कोठे आहें याची कल्पना ही नाही. अशा परिस्थितीत हल्ले मात्र होत आहेत. त्याचप्रमाणे पूर्वी युद्धांमध्ये प्रामुख्याने सैन्य मारले जात होते. आता मात्र निष्पाप लोक मारले जात आहेत. या गोष्टी दहशतवादा मुळे घडत आहेत. आज जगामध्ये १९३ देश आहेत. यापैकी १०० हून अधिक देशांना दहशतवादाचा धोका आहे. हा दहशतवाद राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही पातळ्यांवरचा आहे. जगभरात फार कमी राष्ट्रे आहेत, ज्यांना या दहशतवादाची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष झळ बसलेली नाही. साधारणतः १९९० ते २००० पर्यंत दहशतवादी घटना हा आशिया आणि आफ्रिका खंडापर्यंत मर्यादित होत्या. २००० नंतर अमेरिका आणि युरोप हे दहशतवाद्यांचे टार्गेट बनण्यास सुरुवात झाली.

**शोधनिबंधाचे उद्देश**

1. दहशतवाद म्हणजे काय ते जाणून घेणे
2. दहशतवादाचे स्वरूप विशद करने
3. दहशतवादी प्रवृतीचे उद्देश आणि प्रकार स्पष्ट करणे.
4. दहशतवादाचे कारणे, परिणाम अभ्यासणे
5. दहशतवादी प्रवृतीच्या निर्मूलनासाठी उपाय सुचवणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या मांडणी साठी दुय्यम साधन सामग्रीचा अवलंब करण्यात आला आहे. पुस्तके, संदर्भग्रंथ वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेटच्या मदतीने, निरीक्षण तंत्राच्या साह्याने, विश्लेषणात्मक पद्धतीने विचारांची मांडणी केलेली आहे.

गृहीतकृत्य

जागतिक स्तरावर दहशतवादी प्रवृत्ती मध्ये वाढ होत असून याचे दुष्परिणाम राष्ट्रांच्या विकासावर आणि सर्वसामान्य नागरिकांवर मोठ्या प्रमाणावर होत आहे.

आज दहशतवाद ही जगातील सर्वात मोठी समस्या आहे. तसेच ती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय, जागतिक स्तरावर ही सर्वात मोठी समस्या बनलि आहे. जिचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सर्व देशांवर परिणाम होत आहे.जगातिल अनेक देश दहशतवादाचा सामना करत आहेत. दहशतवाद हा एक हिंसाचाराचा प्रकार आहे जो बेकायदेशीर आहे. याचा उपयोग लोकांना घाबरविण्यासाठी केला जातो.आपल्या भारत देशात सर्व धर्माच्या लोकांमध्ये विविधतेमध्ये एकतेची भावना दिसून येते. परंतु काही लोक हे असे असतात की, त्यांना देशाचे एकीकरण अबादीत ठेवायचे नसते. तर संपूर्ण देश अशांततेचे, भीतीचे, दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा मानस असतो.

दहशतवादाचा अर्थ

दहशतवाद म्हणजे कोणत्याही विनाशकारी शक्तीमुळे समाजात किंवा देशात, जन-माणसांमध्ये भीतीचे वातावरण,परिस्थिती निर्माण करणे होय.

दहशतवादांचा मुख्य उद्देश

दहशतवादी लोकांचा मुख्य उद्देश दहशत निर्माण करणे हा आहे. त्यांचे मुख्य उद्दिष्ट हे सरकार आणि देशातील लोकांमध्ये भीतीचे वातावरण, अशांतता, अस्थिरता, दहशत निर्माण करणे हे असतो.दहशतवाद प्रवृत्तीच्या लोकांना,देश, राज्य, धर्म किंवा जात नसते. दहशतवादी लोक हे मुले, महिला तसेच वृद्ध, अधिकारी, सामान्य माणसे किंवा तरुण मुलांना आपले लक्ष्य बनवून, दहशत निर्माण करून मनावर भीती बिंबवतात.

दहशतवादाचे स्वरूप

जगातील देशांमध्ये सुरू असलेल्या जीवघेण्या स्पर्धाचे पर्यावसन वर्चस्व सिद्ध करण्यात म्हणजेच शेवटी युद्धात होते.दोन जागतिक महायुद्धे झाली. त्याचे दुष्परिणाम सर्व जगाला भोगावे लागले. दहशतवाद हा मात्र काहीसा वेगळा, म्हणजे युद्धाचा छुपा प्रकारच म्हनावा लागेल. यात शत्रुपक्षाला सरळ सरळ युद्धाचे आव्हान दिले जात नाही. दहशतवादात, मनासारखी हवी असलेली गोष्ट मिळवण्यासाठी किंवा प्रतिपक्षाची यंत्रणा खिळखिळी करण्यासाठी लपून छपून हल्ले केले जातात. आकस्मिक हल्ला करून, प्रतिपक्षाच्या मनात एक प्रकारचा धाक निर्माण केला जातो. आपले उद्दिष्ट साधण्या साठी प्रतीपक्षात भिती निर्माण करणे, हा दहशतवादाचा हेतू असतो.कोणत्याही देशामध्ये दहशतवाद पसरविण्यासाठी हिंसक पद्धतींचा अवलंब केला जातो. त्यामुळे आपण देशाचा विकास करण्यासाठी असमर्थ ठरत आहेत.

जेव्हा आपला भारत देश हा विकास करू लागतो तेव्हा देशांतर्गत शक्ती,परकीय शक्ती भारताच्या विकासामध्ये अडथळा निर्माण करतात. दहशतवादी लोक हे लालची लोकांना पैसे देऊन दंगल घडवून

आणतात. तसेच काही दहशतवादी लोक हे बस मधील प्रवाश्याना ठार मारतात, बँकेची लूट करतात तर काही सार्वजनिक ठिकाणी बॉम्ब फेकने, बांब पेरणे, सीमेवर गोळीबार करणे, विमान पळवणे, नागरिकांना क्रूर मारहान करने,धमकावने,जीवे मारने, छळ करणे व त्यांच्यावर घरादाराचा त्याग करण्याची पाळी आणणे, मुलाबाळांना पळवणे, अशा विविध स्वरुना ची दहशत निर्मान करता त तसेच परदेशातुन शस्त्रे आणणे, विमाने खरेदी करणे, तरुणांना घातपाताचे शिक्षण देणे अशा विविध मार्गाने भारतात दंगा माजवणे अशांतता निर्मान करने या स्वरूपाच्या दहशतवादी प्रवृत्ती उघड झाल्या आहेत.एखाद्या संसर्गजन्य रोगा प्रमाने दहशतवाद पसरत जातो. आंतरराष्ट्रीय पातळीवर असलेला हा दहशतवाद आता भारताच्या अंतर्गत राजकारणात प्रवेशित झाला आहे. पक्षा- पक्षाच्या राजकारणात पक्षाचे पुढारी बहुतांशी या गुंडांना आपल्या हाताशी बाळगून असतात. अधिकारी पक्षाची सत्ता उलथवून टाकण्यासाठी गुंडांचा वापर केला जातो. मोठमोठे उद्योगपती, बिल्डर हे सुद्धा गुंडांना सुपारी देऊन आपले हित साधतात. चोरटा व्यापार, घातक अमली पदार्थांची ने आन या गोष्टींना समाजकंटकांना दहशतवाद्यांचा पाठिंबा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असतो.

**दहशतवादाचे प्रकार**

दहशतवादाचे दोन प्रकार आहेत. जसे की राजकीय दहशतवाद आणि गुन्हेगारी दहशतवाद.

**१. राजकीय दहशतवाद**

राजकीय दहशतवाद म्हणजे आपला स्वार्थ पूर्ण करण्यासाठी लोकांमध्ये भीतीची भावना निर्माण करणे.

**२.गुन्हेगारी दहशतवाद**

गुन्हेगारी दहशतवाद म्हणजे लोकांचे अपहरण करून त्यांच्याकडे पैश्यांची मागणी करणे.

**दहशतवादाची मुख्य कारणे**

आपल्या भारत देशात दहशत पसरण्याची अनेक कारणे आहेत. काही लोक हे धर्मावरून आणि जातीभेदावरून, आर्थिक विषमता, मालकी हक्क, हक्क, अधिकारा वरुन भांडणे करतात.

तसेच दारिद्र्य, बेरोजगारी, भूक आणि धार्मिक उन्माद, बदला घेण्याची प्रवृत्ती ही दहशतवादाची मूळ कारणे आहेत. अनेक लोक हे धर्म,जात,हक्क, अधिकाराच्या नावाखाली दहशत निर्माण करायला, ठार मारायला, अशांतता पसरवायला, वेठीस धरायला,खंडणी गोळा करायला, प्रचंड भीती निर्माण करायला सुध्दा मागे पुढे पाहात नाहीत. या सर्व कारणांमुळे देशातील ऐक्याची भावना ही धोक्यात येत आहे. काही परकीय शक्ती देखील भारत देशाला कमजोर बनविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

कोणत्याही देशामध्ये दहशतवाद पसरविण्यासाठी हिंसक पद्धतींचा अवलंब केला जातो. त्यामुळे आपण देशाचा विकास करण्यासाठी असमर्थ ठरत आहेत.

जेव्हा आपला भारत देश हा विकास करू लागतो तेव्हा देशांतर्गत शक्ती,परकीय शक्ती भारताच्या विकासामध्ये अडथळा निर्माण करतात. दहशतवादी लोक हे लालची लोकांना पैसे देऊन दंगल घडवून आणतात.

**दहशतवाद रोखण्याचे उपाय**

दहशतवादाचा सामना करण्यासाठी बहुराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न करणे हे अपरिहार्य आहे. यात प्रामुख्याने खालील बाबी महत्त्वाच्या आहेत.

अ) दहशतवाद म्हणजे काय हे आंतरराष्ट्रीय समुदायाने आणि संयुक्त राष्ट्रसंघ जोपर्यंत निर्धारित करत नाही तोपर्यंत ही समस्या सुटणार नाही.

ब) दहशतवादाचे समर्थन करणाऱ्या राष्ट्रांविषयीचे निकष ठरवणे आवश्यक बाब बनलि आहे.

क) दहशतवादाला समर्थन देणाऱ्या राष्ट्रांवर आर्थिक निर्बंध टाकण्यासाठी इतर राष्ट्रांनी इच्छाशक्ती दाखवणे आवश्यक आहे. यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रयत्न अत्यंत आवश्यक आहेत.

दहशतवाद ही आंतरराष्ट्रीय समस्या बनल्यामुळे आता गुप्तचर माहितीची देवाणघेवाण करणे किंवा त्याबाबत सामूहिक प्रयत्न करणे, यासाठी राष्ट्रे तयार होऊ लागली आहेत. यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरून एकमताने आणि कसोशीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**भारतातील दहशतवाद विरोधी दिवस**

दहशतवादाचा सामना करण्यासाठी देशाला एकत्र मिळून कार्य करणे आवश्यक आहे. म्हणून आपल्या देशात २१ मे ला 'दहशतवाद विरोधी दिवस' साजरा केला जातो. या समस्ये विरुद्ध लढण्यासाठी केवळ एकटा देश काही करू शकत नाही कारण ही जागतिक स्तरावरची समस्या आहे. जागतिक सामूहिक प्रयत्नांतूनच दहशतवादी प्रवृत्तीला खीळ बसू शकेल यात शंका नाही.

**निष्कर्ष**

दहशतवादी प्रवृत्ती ही संपूर्ण मानव जातीला लागलेला एक कलंक आहे. या दहशतवादी प्रवृत्तीने आता आपल्या दैनंदिन जीवनात शिरकाव आहे, ही फार चिंतेची बाब आहे. महानगरांमधून,शहरांमधुन गुंड प्रवृत्ती च्या नावाखाली पसरवली जाणारी दहशत,नोकरी मिळवण्यासाठी, शासकीय कामे पूर्ण करण्यासाठी, महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी, महाविद्यालयात आपलि दहशत निर्माण करण्यासाठी, परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी, लवकरात लवकर आपली वैयक्तिक कामे पूर्ण होण्या साठी द्यावी लागणारी लाच-लुचपत, दसर दिरंगाई या सर्वां मध्येच दहशतवादाची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बीजे पेरली आहेत. यांचे पडसाद दूरदर्शन इतर वाहिन्यांवर दाखवल्या जाणाऱ्या मालिका, चित्रपट,□क्शन फिल्म मधुन पिस्तूल, गोळीबार, हाणामारी दाखवल्या शिवाय कोणताच प्रसंग, कोणतेच दृश्य पूर्ण होत नाही.या स्वरूपाच्या विचारांकडे आणि जीवनशैली कडे आजचा तरुण आकर्षिला जात आहे.

दहशतवादाचा तरुण पिढीवर अतिशय वाईट परिणाम होत आहे. कोणती गोष्ट सरळ मार्गाने मिळत नसेल तर धमकी, धाकदपट या उपायांनी ती हमखास मिळते हा आज तरुण पिठीचा नित्याचा अनुभव होऊन बसला आहे. आज दहशतीने कोणतीही गोष्ट साध्य करु शकतो. ही जगण्याची एक पद्धत होऊ पाहते आहे.

सर्वसामान्य व्यक्तीच्या आणि मानव जातीच्या भवितव्याच्या दृष्टीने दहशतवादाची ही समस्या फार गंभीर आहे. यासाठी कठोर उपाय म्हणजे भ्रष्टाचारी प्रवृत्ती नष्ट करने, नैतिक मूल्यांची रुजवणूक करणे, माणुसकीची जोपासना करणे, कोणत्याही स्वरूपाचे दृष्ट कृत्य करणाऱ्या व्यक्तीला कडक शासन करणे, नैतिक मूल्यांचा अंगीकार सर्व स्तरातून केलाजावा यासाठी प्रयत्न करणे.'जे माझे आहे तेच फक्त मी घेईन. जे इतरांचेआहे ते घेणार नाही' यां मूलभूत नैतिक मूल्यांची रुजवण आपल्याला करावी लागेल तेव्हाच्या पृथ्वीवरील भ्रष्टाचार, दहशतवाद संपायला निश्चितच मदत होईल.. दहशतवादी प्रवृत्ती वर मात करण्या साठी सामूहिक प्रयत्नांचीच नितांत आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची**

1. 1.https://www.marathinibandh.com/2020/06/dahashatwad-nibandh-in--marathi.html?m=1
2. http://hindiscreen.com/essay-on-terrorism-in-marathi/
3. https://maharashtratimes.com/india-news/-pm/articleshow/7160224.cms
4. https://hi.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%86%E0%A4%A4%E0%A4%82%E0%A4%95%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%A6
5. https://www.loksatta.com/sampadkiya/new-challenges-of-terrorism-1131829/
6. https://maharashtratimes.com/editorial/samwad/terrorism/articleshow/51662008.cms
7. रा.ज. लोटे ,भारतातिय सामाजिक रचना आणि समाजिक समस्या, पिंपळापुरे पब्लीशर्स ,नागपुर, 2007, पान नं 247- 248.
8. डॉ वा. भा. पाटिल, महाराष्ट्रातिल चळवळी: सामाजिक व राजकिय, प्रशांत पब्लीकेशन ,जळागाव, 2014, पान नं 209.
9. 9.डॉ मधुकर पाटिल, डॉ. सुनिल अमृतकर, सनकालिन भारत, अर्थव पब्लीकेशन, धुळे, 2016 ,पान नं 178.
10. सुनंदा भद्रशेटे, प्रा शेख, प्रा भालेराव, भारतातल सामाजिक अंदोलने, अरुणा प्रकाशन लातुर ,2010 पान नं 150.



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani